| अनुसूची-ख<br>(व्यावसायिक पदवीपूर्व पाठ्यक्रम) | | |
|---|---|---|
| १ | पदवीपूर्व अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पाठ्यक्रम.<br><br>(अभियांत्रिकी/तंत्रज्ञान स्नातक) (बी.ई. / बी.टेक.) | (क) प्रथमवर्ष<br><br>(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, —<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने भौतिकशास्त्र व गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषयापैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण करून त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत आणि त्याने सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील सर्व विषयास बसून नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे ; **किंवा**<br>(दोन) उमेदवार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयातील पदविकाधारक असला पाहिजे आणि त्याने किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत.<br>(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार, जम्मू व काश्मीर मधील स्थलांतरित उमेदवारी असलेला उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने भौतिकशास्त्र, गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषयापैकी एक विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण करून त्यामध्ये वरिल विषयात एकत्रित ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत आणि त्याने जेईई (मुख्य) प्रश्नपत्रिका-एक मध्ये नॉन झिरो पॉझिटीव प्राप्तांक किंवा सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील सर्व विषयास बसून नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे. तथापि, जेईई (मुख्य) प्रश्नपत्रिका-एक मधील प्राप्तांक प्राप्त असलेल्या उमेदवारास सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील प्राप्तांक प्राप्त असलेल्या उमेदवारापेक्षा प्रथम प्राधान्य देण्यात येईल ; **किंवा**<br>(दोन) उमेदवार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयातील पदविकाधारक असला पाहिजे आणि त्याने किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत.<br>(३) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,—<br>(एक) उमेदवाराने भौतिकशास्त्र व गणित या अनिवार्य विषयासह रसायनशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा तांत्रिक व्यावसायिक विषयापैकी एक |

| | | |
|---|---|---|
| | | विषय घेऊन एचएससी परीक्षा अथवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण करून त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण मिळवलेले असावेत ;<br>(दोन) तो समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी अधिसूचित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा.<br>(ख) थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक) प्रवेश,—<br>(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून अभियांत्रिकी व तंत्रज्ञानमधील समुचित शाखेतील पदविका परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्याने अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका पाठ्यक्रम परीक्षेमध्ये किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत ; **किंवा**<br>(दोन) त्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या विद्यापीठाची बी.एससी.पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत आणि तो गणित हा विषय घेऊन एचएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला असला पाहिजे :<br>परंतु, या प्रवर्गातील उमेदवारांना Engineering Graphics/ Engineering Drawing आणि Engineering Mechanics या विषयाची प्रथम वर्ष अभियांत्रिकी पाठ्यक्रमाची परीक्षा, द्वितीय वर्षाच्या विषयासोबत देऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे ;<br>(तीन) तो समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा. |
| २ | पदवीपूर्व औषधनिर्माणशास्त्र पाठ्यक्रम.<br>(भेषजी स्नातक)<br>(बी.फार्म.) | (क) प्रथम वर्ष<br>(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या अनिवार्य विषयासह गणित किंवा जीवशास्त्र या विषयांपैकी एक विषय घेऊन एचएससी किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण करून त्यामध्ये वरील विषयात एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्ग आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ;<br>(तीन) त्याने सक्षम प्राधिकरणाच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील सर्व विषयास बसून नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे.<br>(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार,— |